जाहीरात

# उपसंचालक आरोग्य सेवा,कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (**NHM**) कोल्हापूर परिमंडळांतर्गत (कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/सिंधुदूर्ग व कोल्हापूर व सांगली महानगरपालिका) या जिल्हयांकरीता **COVID-19** या साथरोगाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने रिक्त पदांची भरती प्रक्रिया खालील तकत्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर पदभरती करणेसाठी खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडुन ईमेल द्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | पदाचे नाव | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन मासीक | ई-मेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| १ | Physician | MD Medicine | ७० वर्षापर्यंत | 75000+ Performance | |
| २ | Anasthetist | Degree/Diploma in Anasthesia | ७० वर्षापर्यंत | 75000+ Performance | |
| ३ | Medical Officer | MBBS | ७० वर्षापर्यंत | 60000 | |
| ४ | AYUSH MO | BAMS/BUMS | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग (७० वर्ष सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी) | 30000 | Covid19ddhskop@gmail.com |
| ५ | Hospital Manager | Any Medical Graduate with one year experience of Hospital administration | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग (७० वर्ष सेवानिवृत्त आरोग्य अधिकारी) | 35000 | |
| ६ | Staff Nurse | GNM / BSc Nursing | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 20000 | Covid19ddhskop@gmail.com |
| ७ | X-Ray Technician | Retd X-ray technician | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 17000 | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ECG Technician | Experience of ECG Technician at least one Year | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 17000 | Covid19ddhskop@gmail.com |
| ९ | Lab Technician | B.Sc DMLT | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 17000 | |
| १० | Pharmacist | D.Pharm/B.Pharm | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 17000 | |
| ११ | Store Officer | Any Graduate with one year experience as Stores Officer | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 20000 | |
| १२ | DEO | Any Graduate,Typing Marathi 30 wpm & Eng 40 wpm,MSCIT (but B.Com Will be Preferred) | ३८ वर्ष खुला प्रवर्ग,४३ वर्ष राखीव प्रवर्ग | 17000 | |

टिप :- अ.क्र.७ वरील पदाकरिता सेवानिवृत्त कर्मचा-यांने अर्ज करावा.

अटी व शर्ती :-

१) इच्छुक उमेदवारांनी दि.१८.०४.२०२० ते २०.०४.२०२० रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या उपरोक्त नमुद ई-मेल वरच अर्ज सादर करावा. अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका ४) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (as applicable) ५) शासकिय/निमशासकिय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र ६) निवासी पुरावा ७) उमेदवाराचा सद्याचा पासपोर्ट साईजचा फोटोसह सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यासह एकाच पिडीएफ फाईलमध्य ई-मेल वर सादर करावा. उमेदवाराचे अर्ज फक्त ई-मेलद्वारे स्विकारण्यात येतील अर्ज पोष्टाद्वारे कुरिअर/प्रत्यक्षात आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. एका उमेदवाराने एकाच पदासाठी अर्ज करणे अनिवार्य ही यांची नोंद घ्यावी.

२) सदर पदासाठीच्या अर्जाचा नमुना **www.nhm.maharashtra.gov.in** & **www.arogya.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरुन download करावा.

३) उपरोक्त पदांसाठी उपरोक्त जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदाकरीता अपेक्षित उमेदवार उपलब्ध न झाल्यास COVID-19 साथरोगाच्या व्यवस्थापनाकरीता सदरील पदे भरणे आवश्यक असल्याने उक्त शैक्षणिक अर्हताधारक शासकिय सेवानिवृत्त उमेदवार हे सदर पदाकरीता पात्र राहतील.

४) COVID-19 साथरोगाच्या अनुषंगाने पदभरती असल्याने संबंधित आजाराचा प्रादुर्भाव जसा वाढत जाईल त्या अनुषंगाने नियुक्ती आदेश देण्यात येतील. यामुळे उपरोक्त पदाकरीता रिक्त पदसंख्या नमुद केलेली नाही तथापि सदरील पदभरतीबाबतचे सर्वाधिकार खालील स्वाक्षरीकर्त्यांनी राखुन ठेवलेले आहेत.

५) उमेदवाराने सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये पदाचे नांव व पदस्थापनेचे ठिकाण (कोल्हापूर/सांगली/सिंधुदूर्ग/रत्नागिरी कोल्हापूर व सांगली महानगरपालिका) स्पष्ट नमुद करावे, तसेच खाडातोड, अवाचनिय अर्ज सादर करु नये अन्यथा संबंधित उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

६) कौन्सीलकडील नोंदणीबाबत अथवा इतर कोणत्याही कागदपत्रांची असलेली वैधता ही चालू कालावधीतील असावी. तथापि वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

७) उपरोक्त जाहिरातीतील १ ते ७ या पदाकरिता कोल्हापूर/सांगली/रत्नागिरी/सिंधुदुर्ग जिल्हयातील सक्षम काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/हृदयविकार इ.नसणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचारी/अधिकारी,बॉड संपलेले वैद्यकिय अधिकारी यांना सदर पदभरतीकरीता प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जात शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झाले त्याबाबतची सर्व माहिती व पुरावा अर्जासोबत सादर करणे अनिवार्य आहे.

८) नव्याने अर्ज करणाऱ्याउमेदवारांनी ए-४ साईज कागदावर संगणकीकृत किंवा टंकलिखीत केलेल्या सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक दस्ताऐवज स्कॅन करुन दि.२०.०४.२०२० रोजी सायं ०५.०० वाजेपर्यंत " उपसंचालक आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर यांच्या नावाने **covid19ddhskop@gmail.com** या मेल आयडीवर सोबत दिलेला अर्ज,इतर शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे एकाच PDF File मध्ये सादर करावे.उमेदवारांनी ई-मेलच्या विषयामध्ये "Application For the post.................स्पष्ट नमुद करावे.विहीत मुदतीनंतर ई-मेलद्वारे प्राप्त झालेले अर्ज आणि अपुर्ण माहितीचे अर्जाचा विचार केला जाणार नाही.

९) सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात (एनएचएमच्या वेबसाईट वर उपलब्ध अर्जाचा नमुना) अर्ज करणे बंधनकारक राहील.

१०) उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोविड १९ साठी नेमणुक देण्यात येणार असुन त्यांची नेमणुक ही कोविड १९ साथ कालावधीपुरतीच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील कोविड १९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणुक आपोआप संपुष्टात येईल,त्यासाठी १ महिन्याची नोटीस दिली जाणार नाही.

११) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरीक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत.

१२) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कर्मचाऱ्यांसाठी असणारे करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

१३) ई मेल द्वारे प्राप्त झालेल्या अर्जावरुन व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल.मेरीट लिस्ट तयार करताना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण उच्च शैक्षणिक अर्हता ऋ शासकीय/निमशासकीय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येवुन संबंधितप त्र उमेदवारास नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

१४) मेरीट लिस्ट तयार झाल्यानंतर ती www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in या वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल.तसेच त्याच दिवशी आक्षेप मागविण्यात येईल.दुसऱ्या दिवशी आक्षेपाचा विचार करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करणेत येईल.

१५) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१६) पुर्ननियुक्तीबाबत,शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मुख्यालयी राहुन सेवा देणे बंधनकारक राहील.

१८) मुलाखत होणार नसलने तसेच पदभरतीचे अर्ज ईमेल द्वारेच घेण्यात येत असल्याने कोणत्याही उमेदवाराने कार्यालयात प्रत्यक्ष भेट देवु नये.

१९) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचा सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अचुक नोंदवावा.तसेच ते भरती प्रक्रिया पुर्ण होईपर्यत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

२०) भरतीप्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाब तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/ नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रदद करण्यात येईल.

२१) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार,पदे कमी जास्त करणे,भरती प्रक्रिया रदद करणे,अटी व शर्तीमध्ये बदल करणे,इ.सर्व अधिकार उपसंचालक आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

सही/-
(डॉ.हे.रा.बोरसे)
उपसंचालक आरोग्य सेवा,
कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर

# कोविड-१९ अंतर्गत कंत्राटी पदाकरिता अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर .

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वताः साक्षांकित करुन लावावे करावा |
|---|

प्रति,
मा. उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर.

पदाचे नावः -----------------------------------

पद स्थापना ठिकाण जिल्हा ...........................

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ----------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ---------------------------------------------

३) जन्म तारीख :- वर्ष ............. महिना ............. दिवस ...........

अक्षरी ---------------------------------------

वय :- .......... वर्ष पुर्ण, ...........महिने, ........ दिवस

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :- ----------------------------------------------------

---------------------------------------------------

---------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ..........................................) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल ID.:- ................................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

जातीचा प्रवर्ग :- -----------------

जातीचे नाव :- -----------------

➢ अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- -----------------

(नमुद करणे अनिवार्य)

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेलया कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)....................................... २).......................................

३)....................................... ४).......................................

५)....................................... ६).......................................

७)....................................... ८).......................................

९)....................................... १०).......................................

१२) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- ............ स्वाक्षरी :- ...................................

दिनांक :- / /२०२० अर्जदारांचे नांव:- ...................................